दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २३४ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.४ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### आमचा कोणताही आमदार काँग्रेसच्या संपर्कात नाही

**मुंबई–**आमच्या पक्षाचे आमदार सोनिया गांधी यांच्या संपर्कात आहेत ही माहिती तटकरे यांना कुणी दिली? आमचा कोणताही आमदार काँग्रेसच्या संपर्कात नाही, लोकसभेत आम्ही सर्व एकदिलाने काम केले, तर विधानसभेत देखील आम्ही एकीने काम करणार आहे, असे स्पष्टीकरण शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले.लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार गटाचे आमदार काँग्रेसमध्ये जाणार, असा दावा राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला होता. त्यावर जयंत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी जयंत पाटील यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियामध्ये येण्याची ऑफर दिली होती. जयंत पाटील पक्षात आल्यास त्यांना प्रदेशाध्यक्ष करु असे आठवले यांनी जाहीर केले होते. त्या ऑफरलाही पाटील यांनी उत्तर दिलं. 'रामदास आठवले यांनी मला ऑफर दिली. ते आपुलकीनं बोलले असतील. मी पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष आहे. मी इतर पक्षात कशाला जाऊ, असेही पाटील म्हणाले.

### बीड लोकसभेचा निकाल सर्वात उशिरा लागणार?

**बीड–**लोकसभा निवडणूक निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच राज्यात सर्वात शेवटी बीड लोकसभा मतदारसंघाचा निकाला लागणार आहे. त्यामुळे, बीडकरांना विजयाचा जल्लोष करण्यासाठी साजरा करण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे, बीडमध्ये पंकजा मुंडे की बजरंग सोनवणे? याच उत्तर राज्यातील निकालांत सर्वात शेवटीच पाहायला मिळणार आहे. त्याचे कारण म्हणजे मॉक पोलमुळे जिल्हा प्रशासनाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.

### खैरेंचा पराभव निश्चित हिमालयात जाण्याची तयारी ठेवावी

**छत्रपती संभाजीनगर–**छत्रपती संभाजीनगरचा निकाल हा महायुतीच्या बाजूने लागणार आहे. चंद्रकांत खैरे यांचा पराभव होणार असून त्यांनी हिमालयात जाण्याची तयारी ठेवावी असा टोला छत्रपती संभाजीनगरमधील महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांनी लगावला आहे. खरे तर संभाजीनगरमध्ये शिवसेनेच्या दोन्ही गटातील उमेदवार आमनेसामने होते. त्यामुळे निकालाकडे विदेश लक्ष आहे. त्यातच निकालाला आता अवघे काहीच तास शिल्लक असताना भुमरेंनी आपल्या विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे.

### शहाजीबापू पाटील रुग्णालयात दाखल

**मुंबई–**सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार शहाजीबापू पाटील यांना ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिथे स्वतः मुख्यमंत्री शिंदे यांनी शहाजीबापू पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी शिंदेंनी पाटलांच्या तब्येतीची विचारपूस केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी पाटील यांच्या पायाच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली होती. मात्र त्यावेळी शिंदे हे त्यांच्या मूळ गावी होते. त्यानंतर सोमवारी शिंदे शहाजीबापू यांच्या भेटीसाठी रुग्णालयात पोहोचले.

### शासनाचे दुष्काळाकडे साफ दुर्लक्ष

**मुंबई–**दुष्काळाच्या मुद्यावर सातत्याने पाठपुरावा करूनही राज्य सरकार कोणतीही ठोस भूमिका घेत नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आता सरकारशी दोनहात करण्याच्या पवित्र्यात आहेत. सातत्याने पाठपुरावा करूनही राज्य सरकारने दुष्काळावर कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. त्यामुळे आपल्याला आता संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल, असे ते म्हणालेत.

# उद्धव ठाकरे १५ दिवसांत मोदी सरकारमध्ये सहभागी होतील

## ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ;रवी राणा यांच्या दाव्याने खळबळ

**अमरावती (वृत्तसंस्था)–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुढील १५ दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये सहभागी होतील, असा मोठा दावा अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचे पती रवी राणा यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे लोकसभा निवडणूक निकालाच्या ऐन तोंडावर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे.लोकसभा निवडणुकीचा निकाल उद्या मंगळवारी जाहीर होणार आहे. बहुतांश एक्झिट पोलमध्ये देशात सलग तिसऱ्यांदा सत्ताधारी एनडीएचे सरकार येणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धोबीपछाड देण्याच्या विचारात असणाऱ्या काँग्रेस प्रणित इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला आहे. या पार्श्वभूमीवर रवी राणा यांनी उद्धव ठाकरे पुन्हा एकदा एनडीएत येणार असल्याचा दावा केला आहे. काही एक्झिट पोलमध्ये लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला १४ जागा मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.**



उद्धव ठाकरे यांनी ज्या प्रकारे लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर भाष्य केले. त्यामुळे ते पुढील १५ दिवसांतच मोदींसोबत परत येतील, त्यांच्या सरकारमध्ये सहभागी होतील, असे रवी राणा यांनी म्हटले आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, येणारा काळ नरेंद्र मोदींचा आहे. देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी नरेंद्र मोदी पंतप्रधान होणे गरजेचे असल्याचे उद्धव ठाकरे यांना माहिती आहे. त्यामुळे निश्चितच पुन्हा एकदा एनडीएसोबत येतील, असे ते म्हणाले.रवी राणा यांच्या या विधानानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते तथा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनीही यावर आपले मत व्यक्त केले आहे. उद्धव ठाकरे व नरेंद्र मोदी पुन्हा एकदा एकत्र येतील यावर मी भाष्य करणार नाही. पण उद्धव ठाकरेंनी मोदींकडे वेळ मागितल्याचे खरे आहे, असे ते म्हणाले.उल्लेखनीय बाब म्हणजे ५ वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ ची लोकसभा निवडणूक शिवसेना व भाजपने महाराष्ट्रात एकत्र येऊन लढली होती. त्यांनी महाराष्ट्रातील ४८ पैकी सर्वाधिक ४२ जागा जिंकल्या होत्या. पण विधानसभा निवडणुकीनंतर दोन्ही पक्षांत मतभेद निर्माण झाले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी एनडीएशी फारकत घेत दोन्ही काँग्रेसच्या मदतीने महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले.पण एकनाथ शिंदे यांच्या बंडाळीनंतर त्यांना आपले मुख्यमंत्रीपद सोडावे लागले. त्यानंतर आता रवी राणा यांनी पुढील १५ दिवसांत उद्धव ठाकरे पुन्हा एकदा मोदींसोबत येणार असल्याचा दावा करून महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ उडवून दिली आहे.

# लोकशाही च्या उत्सवाचा आज सर्वात मोठा दिवस

## सामाजिक एकता आबाधित ठेवून, लोकशाहीचा उत्सव साजरा करावा–पोलीस निरीक्षक आजीतसिंग देवरे यांचे आवाहन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने १०.०३.२०२४ पासुन ०६.०६.२०२४पर्यंत आदर्श आचार संहिता अमलात असुन लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल आज ०४.०६.२०२४ ला जाहीर होणार असुन त्या निमित्याने कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झालेंनंतर सोशल मीडिया द्वारे फेसबुक, इंस्टारग्राम, व्हाट्सअप ग्रुप इतर तत्सम यप्लिकेशच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत . तसेच कोणाचेही विरोधात जाणीवपूर्वक घोषणाबाजी करू नयेत डीजे वाजवणार नाहीत. विनपरवाना विजयी मिरवणूक काढू नयेत

सामाजिक माध्यमावरील ग्रुप ऍडमिन यांनी सदर कालावधीत त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये फक्त ओन्ली ऍडमिन करून बदल करून घ्यावा. जेणेकरून ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुपवर टाकणार नाही. जर कोणत्याही सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट टाकणाऱ्या सदस्यासह ग्रुप ऍडमिन ला जबाबधार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तेव्हा आपली सामाजिक एकता आबाधित ठेवुन, लोकशाहीचा उत्सव साजरा करूया. असे आवाहन तळोधी (बा )पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक आजीतसिंग देवरे यांनी प्रसिद्धीपत्रक काढुन जाहीर आवाहन केले आहे.

# लोकसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय शांतता बैठक पडली पार

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीचा निकाल दि.(४) मंगळवारी जाहीर होणार आहे.निकालाच्या पार्श्वभूमीवर विजयाचे दावे प्रतिदावे सुरू आहे.सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सर्व पक्षीय कार्यकर्ते सक्रिय दिसत आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या अनुषंगाने गोंडपिपरी पोलीस स्टेशन मधे सर्व पक्षीय प्रमुखांची बैठक पार पडली.यावेळी निकाल लागल्यानंतर कोणत्याही राजकीय पक्षांमध्ये द्वेषभावना निर्माण होईल किंव्हा जातीय ,धार्मिक,राजकीय भावना दुखावतील असे कोणतेही कृत्य नारे चीथावणीपूर्ण भाषण देऊ नये तेढ निर्माण होईल असे सोशल मीडिया वर मॅसेज टाकू नये निकालाचा विजयोत्सव साजरा करताना सार्वजनिक अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.विजयाचे बॅनर लावताना प्रशासनाची अधिकृत परवानगी घ्यावी अशा सूचना ठाणेदार रमेश हत्तिगोटे यांनी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना देण्यात याले.यावेळी भाजप तालुका अध्यक्ष बबन नीकोडे,शिवसेना तालुका अध्यक्ष सुरज माडूरवार,काँग्रेस तालुका कार्याध्यक्ष निलेश संगमवार,भाजप शहर अध्यक्ष चेतन गौर,शहर अध्यक्ष राजू झाडे,काँग्रेसचे नगरसेवक सुनील संकुलवार,युवासेना तालुका प्रमुख तुकाराम सातपुते,नागेश इटेकर,माया वाघाडे यांची उपस्थिती होती.



# पाण्यासाठी महिलांचा आक्रोश मोर्चा ग्रामपंचायत वर

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील साठगाव येथे जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल ही केंद्र शासनाची योजना अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असून ठेकेदार यांच्या हलगर्जीपणामुळे साठगाव येथील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्रस्त होऊन गावातील महिलांनी ग्रामपंचायत येथे आक्रोश मोर्चा काढला असून त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाची तारांबळ उडाली.

उन्हाच्या तडाख्याने गावातील पाण्याची पातळी खाली गेली तर गावातील विहरी – बोरवेल आठल्या आहेत. जल जिवण मिशन अंतर्गत गावात नळाची पाईप कुठे टाकली तर कुठे नाही व जुन्या नळाची लाईक ब्रेक झाली त्यामुळे नागरिकांना एक किमी अंतरावरून पाण्यासाठी भटकंती करत नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्यासाठी साठगाव (कोलारी ) ग्रामपंचायतमध्ये शनिवारला ठीय्या मांडला .जल जिवण मिशन अंतर्गत बाराशे लोकसंख्या असलेल्या साठगाव ( कोलारी ) येथे पाण्याची टाकी नळ योजनाचे काम एक वर्षापासून अपूर्ण आहे. गावात हर घर जल योजनांची नळ कनेक्शन व पाईप लाईन अनेक दिवसा पासून अर्धवट टाकण्यात आली. बऱ्याच दिवसापासुन काम बंद आहे. गावकऱ्यांनी योजनेच्या ठेकेदाराला काम सुरु करण्याविषयी विचारले असता उर्मट उत्तरे देतो. ठेकेदाराने गावातील मुख्य रस्त्यावर पाईप लाईनसाठी खड्डे खोदून ठेवले ते बूजविले नाही त्यामूळे नागरिक व जनावरांना ये – जा करण्यास त्रास होत आहे. पाण्यासाठी नागरीकांची भटकंती सुरु आहे. दरम्यान भर उन्हात एक महिला पाण्यासाठी एक किमी अंतरावर गेली असता चक्कर येवून पडली असल्याची माहिती आहे. ठेकेदाराने मजूरांचे पैसे न दिल्याने पाण्याची टाकी व पाईप लाईन नळ योजनाचे काम रखडले आहे.दरम्यान उपसरपंच प्रिती दिडमुठे यांनी नागरीकांची समजूत घालून चिमूर पंचायत समिती पाणि पुरवठा विभागाचे इंजिनिअर मंचमवार ला ग्रामपंचायतमध्ये बोलावून योजनाचे उर्वरित काम व गावात नळाव्दारे पाणी पुरवठा त्वरित सुरु करण्याचे लिखीत पत्र लिहुन घेतले असले तरी सरकारी यंत्रणा कधी काम सुरु करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



पंधरा दिवसापासून ठेकेदाराने पाईप लाईन व न कनेक्शनसाठी रस्त्यात खड्डे खोदून ठेवले आहे. त्यामुळे पाण्यासाठी नागरिकांची भटकंती होत आहे. याविषयी ठेकेदाराला विचारले असता उर्मट उत्तरे देतो. पाण्याच्या टाकीच्या बांधकामात सिमेंट गिट्टी रेतीचे प्रमाण बरोबर नाही पाण्याच्या टाकीचे काम निकृष्ठ दर्जाचे आहे. यंत्रणेने गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम दोन ते तिन दिवसात सुरु न केल्यास आंदोलन करण्यात येईल.

**प्रिती दिडमुठे,उपसरपंच – ग्रामंपचायत साठगाव (कोलारी )**

# शिवाजी कॉलनी मध्ये घराला आग

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील शिवाजी कॉलनी मध्ये राहणारे अण्णाजी निखार यांच्या घराला आग लागल्याने मोठे नुकसान झाले आहे. ही घटना सायंकाळी ७–३०च्या दरम्यान घडली.

घटना घडल्यानंतर येथील केंद्रीय दारूगोळा भंडार च्या अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. केंद्रीय दारूगोळा भंडाराचे अग्निशमन दल ८–३० ला घटनास्थळी पोहोचले. त्यांनी आज विझवायला सुरुवात केली. वृत्त लिहीपर्यंत आग विझविण्याचे कार्य सुरु असल्यामुळे निश्चित नुकसान किती झाले, याचा अंदाज लागू शकला नाही. आग लागण्याचे कारण अज्ञात असले तरी परिसरातील जमलेल्या लोकांमध्ये आग शॉर्ट सर्किट मुळे लागल्याची चर्चा होती.धोका टाळण्यासाठी परिसरातील विद्युत प्रवाह बंद करण्यात आला होता.



# पुलगावच्या वीरांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

**पुलगाव । प्रतिनिधी**

केंद्रीय दारूगोळा भांडार येथे ३१ मे २०१६ ला येथे आगीची भीषण दुर्घटना घडली. ज्यामध्ये देशाच्या स्फोटक सामग्रीचे रक्षण करताना आपल्या १९ जवानांनी बलिदान दिले आणि अनेक सैनिक जखमी झाले. आपल्या या शूर सैनिकांच्या बलिदानाला ८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या आठव्या पुण्यतिथीनिमित्त सीएडी कॅम्पसमधील हुतात्मा स्मारकाला (शक्तीस्थळ) पुष्पहार अर्पण करून शहीद दिन सोहळा समितीचे अध्यक्ष डॉ. अभ्युदय मेघे यांच्या हस्ते श्रद्धांजली अर्पण करण्यात आली या ठिकाणी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या श्रध्दांजली कार्यक्रमात सर्व अधिकारी, अग्निशमन कर्मचारी व युनियनचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# खरंच, इव्हीएमचा कौल कोणाला?

**आपल्या भारत देशात आज ४ जूनला १८व्या लोकसभा निवडणुकीचं निकाल जाहीर होत आहे. देशात एकूण सात टप्प्यामध्ये लोकसभा निवडणूक झाली आहे. मतदान करण्यासाठी आपण इव्हीएमचा वापर केला. या निवडणुकीत इव्हीएम हटाओ देश बचाओचा नारा विरोधकांकडून देण्यात आला होता. कारण ज्या उमेदवाराचा पराभव होतो त्याला असं वाटतं की इव्हीएममुळे आपला पराभव झाला. त्यामुळे प्रत्येक निवणुकीत इव्हीएमचा मुद्दा हा समोर येतच असतो. सर्वाधिक मते मिळालेला उमेदवार निवडून आला, असे जाहीर केले जाते. त्याला इव्हीएमने कौल दिल्याचे समजले जाते. हाच लोकशाहीच्या उत्सवाचा परमोच्च क्षण होय. याबद्दलचा माहितीपूर्ण संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी मांडला आहे... संपादक.**

मतदानाची मोजणी कशी होत आहे? तर देशात इव्हीएमवरून विरोधक नेहमी आक्रमक होताना पाहायला मिळतात. जर अमेरिका सारख्या देशामध्ये तो हॅक होऊ शकतो तर भारतात का नाही? असा सवाल त्यांचा आहे. त्यामुळे इव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या. अशी त्यांची मागणी आहे. पण हे सुरक्षित मशीन आहे असं निवडणूक आयोग सांगत आलाय. इव्हीएम म्हणजे काय? तर इलेक्ट्रिक वोटर मशीन म्हणजे त्यालाच आपण इव्हीएम म्हणतो. त्याचा प्रस्ताव सर्वात आधी सन १९७७मध्ये मांडण्यात आला. त्यानंतर सन १९७९मध्ये पहिल्यांदा इव्हीएम तयार करण्यात आले. पुढे हळू हळू संपूर्ण देशात इव्हीएमवर मतदानाची प्रक्रिया सुरू झाली. देशात दोन ठिकाणी या मशीन तयार केले जातात. भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड आणि इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या दोन्ही कंपन्या भारत सरकारच्या मालकीच्या आहेत.

मतमोजणी- मतदान झाल्यानंतर इव्हीएमला सील मारून त्याला एका स्टोअर रूममध्ये ठेवण्यात येते. त्याच्या सुरक्षेसाठी केंद्रीय दलाचे जवान चोवीस तास तैनात असतात. जेव्हा निकालाचा दिवस असतो, तेव्हा ती मशीन स्टोअर रूममधून बाहेर काढण्यात येते. मतमोजणी करत असताना एका वेळी फक्त १४ मशीनचीच मोजणी केली जाते. त्यासाठी १४ टेबलची व्यवस्था करण्यात येते. प्रत्येक टेबलवर एक निवडणूक अधिकारी, उमेदवार आणि त्या त्या पक्षाचा एक सदस्य असतो. मतमोजणी सुरू असताना तो या संपूर्ण प्रक्रियेवर नजर ठेवतो. उमेदवाराने इव्हीएमला हात लावू नये यासाठी मध्ये एक बरिकेट्स ठेवण्यात येतो. सर्वात आधी पोस्टल मतांची मोजणी होते. त्यानंतर अर्ध्या तासाने इव्हीएम मतांची मोजणी होते. ही मोजणी सुरू करण्याआधी त्याच्या सीलची तपासणी केले जाते. मशीनसोबत कोणतीही छेडछाड तर झाली नाही ना? याची तपासणी मतमोजणी अधिकारी करून घेतो. त्यानंतरच मतमोजणीसाठी ते मशीन सुरू करण्यात येते. लगेच रिझल्ट बटन दाबलं जाते. कोणत्या उमेदवाराला किती मते पडली याची आकडेवारी समोर येते. त्यांनतर ही आकडेवारी फॉर्म क्रमांक १७ सीमध्ये नोंदवली जाते. त्यावर जो कोणी उमेदवाराच्या बाजूने मतमोजणीसाठी उपस्थित आहे, त्याची सही घेण्यात येते. त्यानंतर त्या फॉर्मला रिटर्निंग ऑफिसर्सकडे पाठवण्यात येते. आलेल्या निकालाला एका ब्लॅक अँड व्हाईट बोर्डवरती लिहण्यात येते. प्रत्येक फेरीत होणाऱ्या मतमोजणीची आकडेवारी राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याला सांगण्यात येते. ही प्रक्रिया जोपर्यंत मतमोजणी पूर्ण होत नाही तोपर्यंत चालत राहते. शेवटी ज्या उमेदवाराला जास्त मते मिळाली अशा उमेदवाराला विजयाचं प्रमाणपत्र देऊन निवडणूक अधिकारी त्याला विजय घोषित करतात. या निवडणुकीत इव्हीएम हटाओ देश बचाओचा नारा विरोधकांकडून देण्यात आला होता. कारण ज्या उमेदवाराचा पराभव होतो त्याला असं वाटतं की इव्हीएममुळे आपला पराभव झाला. त्यामुळे प्रत्येक निवणुकीत इव्हीएमचा मुद्दा हा समोर येतच असतो. सर्वाधिक मते मिळालेला उमेदवार निवडून आला, असे जाहीर केले जाते. त्याला इव्हीएमने कौल दिल्याचे समजले जाते. हाच लोकशाहीच्या उत्सवाचा परमोच्च क्षण होय. आज निकालाची उत्सुकता शिगेला पोहोचते. लोक निकाल ऐकण्यासाठी रेडिओला कान लावून, पाहण्यासाठी टिव्हीकडे डोळे फाडफाडून आणि प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी तहसील कार्यालयासमोर ठाण मांडून बसतील. निवडून येणारा उमेदवार, त्याच्या पार्टीतील नेते आणि समर्थक गुलाल उधळून होळी खेळत प्रतिस्पर्धकांना, पराजित उमेदवारांना वाकुल्या दावतील. दोन बोटे वर करून विजयाची खून दाखत विजयी मिरवणूकीद्वारे थाटामाटात मिरवतील. चला तर सज्ज होउया.

!! विजयी उमेदवाराचे हार्दिक हार्दिक अभिनंदन जी !!



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायत कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरात अखिल भारतीय ग्राहक पंचायत ची महिला कार्यकारिणीची कार्यशाळा देशपांडेपूरम येथे दिं.२ जून रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेत राष्ट्रीय सचिव अरुणजी देशपांडे यांनी मौलीक मार्गदर्शन केले. समाजात वावरत असताना ग्राहक म्हणून आपली जबाबदारी, आपले कर्तव्य आणि न्याय प्रक्रिया यासंदर्भात महिलांशी त्यांनी संवाद साधला. अर्थ कारणाशी संबधित आपण ग्राहक आहोत, यामुळे एकमेकांच जीवन सुखकारक करण्यासाठी ग्राहक चळवळ सुरु झाली. नाण्याची घेण देण प्रक्रिया वाढत गेली, तेव्हा ग्राहक शब्द निर्माण झाला. शोषणमुक्त समाज निर्माण करण्यासाठी ग्राहक पंचायत कार्यरत आहे. लोकल टू होकल ही मागणी वाढत गेली, तस संसाराच बजट वाढल, आणि यातून अर्थ व्यवस्थापन सुरु झाल, महिला या अर्थ कारणात सक्षम असतात, आणि उत्तम नियोजन त्या करतात. संधीच सोन करुन कुंटूबाच आणि समाजाच नियोजन त्या करतात. हे करतानाच ग्राहक पंचायत मध्ये आपण कार्यरत आहोत याची




जाणीव महिलांनी ठेवली तर जनजागरण, ग्राहक जागरण महिला उत्तम रितीने करु शकतात. यासाठी ग्राहक पंचायत चळवळीची बांधणी करताना आपल पद आणि आपल कर्तव्य हे समजून घेऊन कार्यरत रहाण महत्वाच. दैनंदिन जीवन जगत असताना आहार,व्यवहार, आवास निवास, नागरी सुविधा,आरोग्य, शिक्षण, यासाठी संघटित होऊन संघर्ष करणे गरजेचे आहे. ही ताकद महिला एकत्रित पणे आणू शकतात. ग्राहकाचे अधिकार यामध्ये ग्राहक सुरक्षितता, निवड अधिकार, शिक्षण निवड अधिकार, दाद मागण्याचा अधिकार, आणि ग्राहक न्यायालय,यावर विस्तृत पणे मार्गदर्शन करण्यात आले. सेंटर लेर्पीीशी ीिशिलींळेप ऑथॉरिटी यांचे कार्य आणि त्याची व्यापकता यावर डॉ. स्मिता अवचार यांनी विशेष माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर अध्यक्ष भारती भांडेकर बिस्वास यांनी केले तर आभार ड ज्योती पत्की यांनी मानले. या कार्यशाळेत प्रसिध्दी प्रमुख संगीता धारूरकर, ड जयश्री देशपांडे,ड अंजली कुलकर्णी, भारती पवार, डॉ सुरेखा मराठे, अंजली बुगे, ड मुशीर कादरी, जोती खिस्ती, शरदिनी देशमुख, ई अनेक महिला उपस्थित होत्या.

# पैठण ग्रामीण भाग पाणीटंचाईने होरपळला

**पैठण । प्रतिनिधी**

जायकवाडी धरणाच्या पायथ्याशी असलेल्या पैठणचा ग्रामीण भाग पाणीटंचाईने अक्षरशः होरपळत आहे. तालुक्यातील ८६ गावचे जलस्रोत पूर्णपणे आटले आहेत. तेथील १ लाख ६८ हजार १४३ नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी १०४ टँकर्सवर अवलंबून राहावे लागत आहे. या टँकर्ससाठी 'नाथसागर'मधून दररोज २४ लाख ९६ हजार लिटर्स एवढ्या पाण्याचा उपसा करावा लागत आहे ! उन्हाळ्याच्या उत्तरार्धात व मान्सून दाखल व्हायला काही दिवस शिल्लक असताना जायकवाडी धरणात केवळ ५ टक्केच पाणीसाठा वापरायोग्य आहे. अशा बिकट स्थितीत पैठणच्या ग्रामीण भागातील पिण्याच्या पाणीटंचाईने रौद्ररूप धारण केले आहे. ८६ गावे, वाड्या, तांडे व शेतवस्त्यांवरील जलस्त्रोत आटत चालले आहेत. विहिरींनी तळ गाठला आहे. तर हापशांनी माना टाकल्या आहेत. परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी महिला व अबालवृद्ध ग्रामस्थांना डोंगर दऱ्याखोऱ्यांत भटकंती करावी लागत आहे. पहाटेपासून टँकर्स((८६ गावे अन् १०४ टँकर्स)) 'पाणीबाणी'च्या या भयावह पार्श्वभूमी वर



प्रशासनाकडे टँकर शिवाय पर्याय राहिलेला नाही. तहसील कार्यालयातून टँकर मागणीचे प्रस्ताव प्राप्त होताच पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागातर्फे त्या-त्या गावांना टँकरने पाणी सुरू करण्यात येत आहे. संपूर्ण उन्हाळ्यात टँकर्सची संख्या वाढतच राहिली. आजमितीस ८६ गावांना १०४ टँकर्स पाणीपुरवठा करत आहेत. १ लाख ६८ हजार १४३ नागरिकांचे लक्ष आणि लक्ष्य दिवसभर केवळ टँकर्सकडे लागून असते. जायकवाडी धरणाच्या जलाशयातून या टँकर्समधे पाणी भरून संबंधित टंचाईग्रस्त गावांकडे रवाना केले जाते. यासाठी पैठण एमआयडीसी भागातील मुधलवाडी, बिडकीन-शेंद्रा डीएमआयसीतील कचनेर, खोडेगाव व छत्रपती संभाजी नगर महापालिकेच्या फारोळा (ता. पैठण) जलशुद्धीकरण केंद्र या पॉइंटवरून दररोज २४ लाख ९६ हजार लिटर्स एवढ्या पाण्याचा उपसा केला जात आहे.

# तेलंगणातून येणारा गुटखा केला जप्त

## १९ लाखाचा गुटखा वाहना सह जप्त :अन्न व औषध प्रशासन विभागाची धाडसी कारवाई

**उमरखेड । प्रतिनिधी**

आंध्र प्रदेश तसेच तेलंगणा राज्यातून मोठ्या प्रमाणात सुगंधी तंबाखू मोठ्या प्रमाणात विदर्भात येत असून तो रोखण्यासाठी आता अमरावती विभागीय पातळीवरील अन्नसुरक्षा विभाग सक्रिय झाला असून काल याच विभागाने हादगाव उमरखेड रोडवर सायंकाळी चार वाजताच्या दरम्यान एका वाहनाला ताब्यात घेऊन तपासणी केली असता त्यामध्ये ४८ गोरी सुगंधी तंबाखू पान मसाला आढळून आला. तीस मे रोजी अन्नसुरक्षा अधिकारी संदीप सूर्यवंशी अन्य सुरक्षा अधिकारी दक्षता यांच्या पथकाने हदगाव उमरखेड रोडवर सायंकाळी चार वाजता माहिती मिळाल्यावरून त्या ठिकाणी सापळा रचला आणि आदीलाबाद विभागीय अन्नसुरक्षा विभागाची कारवाई? स्थानिकांचे काय ? ✻ यवतमाळ येथील अन्नसुरक्षा विभाग अलीकडे कामकाज करण्यामध्ये कमी



पडतो की काय अशी शंका आता वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना येऊ लागली आहे त्यामुळेच वरच्या स्तरावरूनच आता कारवाई करण्याचे धाडस केल्या जात आह तेलंगणा येथून सुगंधी तंबाखू घेऊन येणारे वाहन महिंद्रा बोलेरो थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात ४८ बोरी सुगंधी तंबाखू पान मसाला आढळून आला आहे या वाहनाचा क्रमांक टी एस झिरो एक यु ए ३३ २० असा आहे संबंधित वाहन या रोडने येत असतानाच या मार्गावर असलेल्या पथकाने आपल्या पथकाला मोबाईल वरून माहिती देत सतर्क केले आणि अलगद है वाहन या रोडवर पकडण्याचा प्रयत्न केला असता सदर वाहन पळून जाण्याच्या तयारी रस्तांनाच त्याचा पाठलाग करून वाहन ताब्यात घेतले या वाहनाचा चालक शेख समीर हुसेन वय वर्षे २५ राहणार आदीलाबाद तेलंगणा हा असल्याचे सांगण्यात आले अत्र सुरक्षा पथकाने ताब्यात घेतलेला पान मसाला पंचनामा करून त्तो पुढील कारवाईसाठी पोलिसांकडे सुपविण्यात आला तर पानमसाला मात्र याच विभागाने आपल्याकडे ठेवला यात अन्नसुरक्षा विभागाने पोलिसांकडे तक्रार नोंदविली पोलिसांनी या आरोपी विरुद्ध कलमाखाली गुन्हे दाखल केले आहे पोलिसांनी मालाचा पंचनामा करून बाराशे एक किलो तसेच पान मसाला आणि वाहन असा १९ लाख ३५००० ७८० रुपयाचा मुद्देमाल जात करून चौकशीत घेतला आहे.

# चरित्र निर्माण संस्कार शिबिराचा सांगता समारोह उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

ग्लोबल महानुभाव संघाच्या वतीने प्रतिवर्षी घेण्यात येणाऱ्या शिबिराचा सांगता समारोह गुरुवारी, ३० मे रोजी सायंकाळी ६ वाजता महंत नागराज बाबाजीच्या आशीर्वादाने व प्रसन्नतेने तसेच प. पू. नागराज बाबाजी (आत्याबाई ) प. पू. संतोष मुनी शास्त्री यांच्या आशीर्वादाने महानुभाव आश्रमात संपन्न झाला. या सोहळयाला छत्रपती संभाजीनगराच्या माजी महापौर अनिता घोडेले यांची उपस्थिती होती.

२१ मे पासून सुरू असलेल्या निवासी शिबिरात १६० मुलांचा सहभाग होता. दैनिक कार्यक्रमात दोन बौद्धिक सत्र संपन्न होत होते. त्यात एक धार्मिक व एक समाजिक स्वरुपाचे ज्ञान मुलांना देण्यात आले. त्याचबरोबर त्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा या करिता सांस्कृतिक व मैदानी कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात आले. मोनिका बकाल यांच्या अथक प्रयत्नांतून मुलांनी खूप आनंद घेतला व शिक्षण घेतले. श्रीमान बाळकृष्ण अंजनगावकर (नाशिक) यांची पूर्ण वेळ उपस्थिती होती. श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम ट्रस्ट व ग्लोबल महानुभाव संघाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

शिबिरात सहभागी मुला-मुलींना पारितोषिके देण्यात आली. माजी महापौर अनिता घोडेले यांच्या मार्गदर्शनाने व सांस्कृतिक कार्यक्रमाने सामारोप सोहळ्याची सांगता झाली. राष्ट्रभक्ती संस्कार व चरित्र निर्माण या तिन्ही आयामाच्या आधारे शिबीर संपन्न झाले. यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महत्वाचे सहकार्य लाभले.

# लोकसभा निवडणूक मतमोजणीसाठी लातूर प्रशासन सज्ज मत मोजणी केंद्रात मोबाईल,इलेक्ट्रॉनिक वस्तू आणण्यास सक्त मनाई

**लातूर । प्रतिनिधी**

लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या सहा विधानसभा क्षेत्रनिहाय मतमोजणी फेऱ्यामध्ये सर्वाधिक २८ मतमोजणी फेऱ्या लातूर शहर विधानसभा मतदारसंघात होतील. अहमदपूर विधानसभा मतदारसंघात २७, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात २६, निलंगा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात २५ आणि उदगीर व लोहा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात प्रत्येकी २४ मतमोजणी फेऱ्या होणार आहेत. तसेच टपाली मतमोजणीची १ फेरी होणार आहे. एकूण लोकसभा मतदारसंघाचा विचार करता मतदान यंत्रातील मतमोजणीच्या २८ आणि टपाली मतमोजणीची १ फेरी झाल्यानंतर अंतिम निकाल घोषित केला जाईल. मतदान यंत्रावरील प्रत्येक फेरीला अंदाजे २० मिनिटे ते ३० मिनिटे लागण्याची शक्यता आहे. मतमोजणी केंद्र परिसरात स्वतंत्र मिडिया सेंटर तयार करण्यात आले असून भारत निवडणूक आयोगाकडून प्राधिकरपत्र (पासेस) दिलेल्या प्रसारमाध्यम प्रतिनिधींना याठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. प्रत्येक फेरीचा उमेदवारनिहाय मतांची आकडेवारी याठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी दोन स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. शासकीय महिला तंत्रनिकेतनच्या पूर्वेकडील बाजूच्या प्रवेशद्वारातून प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच जनतेसाठी मतमोजणी केंद्राबाहेरील ध्वनिक्षेपकाद्वारे फेरीनिहाय उमेदवारांना मिळालेल्या मतांची माहिती दिली जाणार आहे.मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तू घेवून येण्यास मनाई मतमोजणी केंद्रात मोबाईल, कॅमेरा, लॅपटॉप, आयपॅड, तसेच इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तु नेण्यास मनाई करण्यात आला आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनासुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल. प्रत्यक्ष मतमोजणी केंद्रात जातांना मोबाईल मिडीया सेंटर येथे जमा करावा लागेल. मतमोजणी केंद्र परिसरात तगडा बंदोबस्त मतमोजणी केंद्राच्या परिसरात सुरक्षेच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे. केंद्रीय राखील पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि लातूर जिल्हा पोलीस आणि गृहरक्षक दलातील जवानांचा यामध्ये समावेश राहणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या नेतृत्वात ६ पोलीस उपाधीक्षक, १३ पोलीस निरीक्षक, ४८ सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ४६० पोलीस जवान, दंगा विरोधी दलाच्या ३ तुकड्या, शीघ्र कृती दलाची १ तुकडी, गृहरक्षक दलाचे ३०० जवान यांच्यासह राज्य राखीव पोलीस दल आणि केंद्रीय पोलीस दलाची तुकडी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आली आहे. मतमोजणी केंदाच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू लातूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून, २०२४ रोजी शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन, बार्शी रोड, लातूर येथे सकाळी ८ पासून सुरु होणार आहे. या मतमोजणी केंद्राच्या २०० मीटर परिसरात ४ जून २०२४ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे.

सह्याद्रीचा राखणदार



## ७-८ जूनला मान्सून तळ कोकणात दाखल होणार

# पुढील २ दिवस राज्यात पावसाची शक्यता, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, कोकणात इशारा

**पुणे (वृत्तसंस्था)**

नुकतेच मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे. त्यानंतर राज्य मान्सूनची प्रतीक्षा आहे. आता येत्या ७ ते ८ जूनला मान्सून तळकोकणात दाखल होणार असल्याचा अंदाज आहे. तसेच पुढील दोन दिवस राज्यात आता मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मराठवाडा, कोकण, मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात मोठी वाढ झाली होती. अनेक जिल्ह्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. मात्र आता राज्यात पावसाचा अंदाज असल्याने काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यातच येत्या २ ते ३ दिवसात मान्सून कर्नाटकात पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर ७ ते ८ जुनपर्यंत मान्सून राज्याच्या प्रवेशद्वार असलेल्या सिंधुदुर्गात दाखल होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.तसेच जूनच्या सुरुवातीला मान्सूनपुर्व पाऊस राज्यात सक्रिय होणार आहे. त्याप्रमाणे आज २ जून रोजी दक्षिण पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली, धाराशिव, लातूर, नांदेडमध्ये पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. तर ३, ४ आणि ५ जून रोजी मध्य महाराष्ट्रातील अहमदनगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, बीड, जालन्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.तसेच ६, ७ आणि ८ जून रोजी अरबी समुद्रात देखील एक प्रणाली सक्रिय होणार आहे. सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, ठाणे, मुंबई, पालघरच्या काही भागात तीन दिवस ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २ जून ते ८ जून अनेक भागात पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे.



### खैरेंचा पराभव निश्चित हिमालयात जाण्याची तयारी ठेवावी

# लागणारे साहित्यही आम्ही पुरवू, महायुतीचे उमेदवार भुमरे यांचा टोला

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–छत्रपती संभाजीनगरचा निकाल हा महायुतीच्या बाजूने लागणार आहे. चंद्रकांत खैरे यांचा पराभव होणार असून त्यांनी हिमालयात जाण्याची तयारी ठेवावी असा टोला छत्रपती संभाजीनगरमधील महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांनी लगावला आहे. खरे तर संभाजीनगरमध्ये शिवसेनेच्या दोन्ही गटातील उमेदवार आमनेसामने होते. त्यामुळे निकालाकडे विदेश लक्ष आहे. त्यातच निकालाला आता अवघे काहीच तास शिल्लक असताना भुमरेंनी आपल्या विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे.



एका वृत्तवाहिनीशी भुमरे बोलत होते. दरम्यान चंद्रकांत खैरे यांनी प्रचारादरम्यान मी निवडून नाही आलो तर हिमालयात जाईल असे विधान केल्याचा दावाही भुमरेंनी केला आहे. भुमरे म्हणाले, ''निवडणुकीच्या प्रचारादरम्यान चंद्रकांत खैरे म्हणाले होते की, यावेळी मी निवडून नाही आलो तर हिमालयात जाईल. आता आम्ही त्यांना हिमालयात पाठवण्याची तयारी पूर्ण केली आहे. आम्ही त्यांना निरोप देण्यासाठी सज्ज आहोत. त्यांना जे साहित्य लागेल ते सुद्धा आम्ही देणार आहोत, असा टोला संदिपान भुमरे यांनी लगावला आहे.पुढे बोलतांना त्यांनी एक्सिट पोलच्या आकडेवारीवरही प्रतिक्रिया दिली आहे. खरे तर यामध्ये संभाजीनगरमध्ये चंद्रकांत खैरे आघाडीवर तर संदीपान भुमरे हे पिछाडीवर असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र भुमरेंनी आपलाच विजय निश्चित असल्याचे म्हंटले आहे. ''एक्झिट पोलचा अंदाज काय सांगतो त्याच्यापेक्षा निकालातील आकडेवारी महत्वाची आहे. मला खात्री आहे की, उद्या जो निकाल येईल त्यात इथे महायुतीचा उमेदवार प्रचंड मतांनी निवडून येईन'', असे भुमरे म्हणालेत.दरम्यान, छत्रपती संभाजीनगर मतदारसंघ हा पहिल्यापासून शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे. चंद्रकांत खैर या मतदारसंघातून ४ वेळा खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. मात्र २०१९ निवडणुकीत एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी त्यांचा अत्यंत कमी फरकाने पराभव केला होता. आता शिवसेनेत दोन गट पडल्यानंतर दोन्ही पक्षांनी या मतदारसंघातून आपआपले उमेदवार उभे केले आहेत. त्यामुळे यंदाही संभाजीनगरमध्ये चौरंगी लढत होत आहेत.

# आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धे मध्ये सुरज बांगर ची सुवर्ण कामगिरी



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २४ ते २८ मे दरम्यान मलेशिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सिलंबम स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याच्या भूमीतील गरीब शेतकरी कुटुंबातील सर्वसाधारण असणारे व्यक्तिमत्व दिलीप बांगर यांचा मुलगा असून पाटोदा तालुक्यातील भायाळ या गावचा हा भूमिपुत्र कु.सुरज बांगर याने ५० किलो खालील वजनी गटामध्ये काठी ची लढत (पोरुथल) या खेळ प्रकारात भारतासाठी सुवर्णपदक मिळवले आणि शस्त्र फिरवणे या खेळ प्रकारात कांस्य पदक मिळवले.या स्पर्धेमध्ये भारत देशा सोबत श्रीलंका, मलेशिया, स्वित्झर्लंड, दुबई, कतार, पाकिस्तान, सिंगापूर, बांगलादेश या देशातील ५०० पेक्षा अधिक खेळाडूंनी भाग घेतला होता. भारत देशांमधून १५० खेळाडूचा संघ मलेशिया येथे सहभागी झाला होता.

या सुवर्ण कामगिरी साठी प्रशिक्षक संजय बनसोडे यांनी सुरज बांगरच्या यशाबद्दल कौतुक केले. याचबरोबर युवा उद्योजक अशोक दहिफळे यांचा हा भाचा आहे या यशाबद्दल व्यापारी वर्गातही कौतुक केले जात आहे तसेच पाटोदा तालुकाचे सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांनीही सुरज बांगर कौतुक करून शुभेच्छा दिल्या समस्त ग्रामस्थ यांनी सुरज बांगर यांचा सत्कार करण्यात आला.

# उद्धव ठाकरे १५ दिवसांत मोदी सरकारमध्ये सहभागी होतील: ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ-रवी राणा

**अमरावती (वृत्तसंस्था)**–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुढील १५ दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये सहभागी होतील, असा मोठा दावा अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचे पती रवी राणा यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे लोकसभा निवडणूक निकालाच्या ऐन तोंडावर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ माजली आहे.



लोकसभा निवडणुकीचा निकाल उद्या मंगळवारी जाहीर होणार आहे. बहुतांश एक्झिट पोलमध्ये देशात सलग तिसऱ्यांदा सत्ताधारी एनडीएचे सरकार येणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धोबीपछाड देण्याच्या विचारात असणाऱ्या काँग्रेस प्रणित इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला आहे. या पार्श्वभूमीवर रवी राणा यांनी उद्धव ठाकरे पुन्हा एकदा एनडीएत येणार असल्याचा दावा केला आहे. काही एक्झिट पोलमध्ये लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला १४ जागा मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.उद्धव ठाकरे यांनी ज्या प्रकारे लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर भाष्य केले. त्यामुळे ते पुढील १५ दिवसांतच मोदींसोबत परत येतील, त्यांच्या सरकारमध्ये सहभागी होतील, असे रवी राणा यांनी म्हटले आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, येणारा काळ नरेंद्र मोदींचा आहे. देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी नरेंद्र मोदी पंतप्रधान होणे गरजेचे असल्याचे उद्धव ठाकरे यांना माहिती आहे. त्यामुळे निश्चितच पुन्हा एकदा एनडीएसोबत येतील, असे ते म्हणाले.रवी राणा यांच्या या विधानानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते तथा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनीही यावर आपले मत व्यक्त केले आहे. उद्धव ठाकरे व नरेंद्र मोदी पुन्हा एकदा एकत्र येतील यावर मी भाष्य करणार नाही. पण उद्धव ठाकरेंनी मोदींकडे वेळ मागितल्याचे खरे आहे, असे ते म्हणाले.उल्लेखनीय बाब म्हणजे ५ वर्षांपूर्वी म्हणजे २०१९ ची लोकसभा निवडणूक शिवसेना व भाजपने महाराष्ट्रात एकत्र येऊन लढली होती. त्यांनी महाराष्ट्रातील ४८ पैकी सर्वाधिक ४२ जागा जिंकल्या होत्या. पण विधानसभा निवडणुकीनंतर दोन्ही पक्षांत मतभेद निर्माण झाले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी एनडीएशी फारकत घेत दोन्ही काँग्रेसच्या मदतीने महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले.पण एकनाथ शिंदे यांच्या बंडाळीनंतर त्यांना आपले मुख्यमंत्रीपद सोडावे लागले. त्यानंतर आता रवी राणा यांनी पुढील १५ दिवसांत उद्धव ठाकरे पुन्हा एकदा मोदींसोबत येणार असल्याचा दावा करून महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ उडवून दिली आहे.

### शहाजीबापू पाटील रुग्णालयात दाखल

# गुडघ्यावरील शस्त्रक्रियेनंतर शिंदे पोहोचले भेटीला, रुग्णालय गाठून तब्येतीची केली विचारपूस

**मुंबई (वृत्तसंस्था)**–सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार शहाजीबापू पाटील यांना ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिथे स्वतः मुख्यमंत्री शिंदे यांनी शहाजीबापू पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी शिंदेंनी पाटलांच्या तब्येतीची विचारपूस केली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी पाटील यांच्या पायाच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली होती. मात्र त्यावेळी शिंदे हे त्यांच्या मूळ गावी होते. त्यानंतर सोमवारी शिंदे शहाजीबापू यांच्या भेटीसाठी रुग्णालयात पोहोचले.

शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर शिंदे यांनी फोनवरून शहाजीबापू पाटील यांची चौकशी केली होती. त्यानंतर आज रुग्णालय गाठून शिंदेंनी डॉक्टर आणि त्यांच्या नातेवाईकांकडून त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती जाणून घेतली आहे. तसेच त्यांनी लवकरात लवकर त्यांनी पूर्ण बरे होऊन पुन्हा एकदा जनसेवेसाठी कार्यरत व्हावे अशी अपेक्षा त्यांच्याशी बोलताना व्यक्त केली आहे.दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांनी यासंदर्भात ट्विट करत माहिती दिली आहे. त्यांनी शहाजीबापू पाटील यांच्या भेटीचे फोटोही शेअर केले आहेत. शिंदेंनी शहाजीबापू यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती दिली आहे. यावेळी शहाजीबापू पाटील यांचे कुटूंबीय आणि सहकारी तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटे हेदेखील यावेळी उपस्थित होते.



## रवी राणांचा राजकारणाशी काहीही संबंध आलेला नाही-संजय राऊत

**मुंबई (वृत्तसंस्था)**–रवी राणा यांचा राजकारणाशी काहीही संबंध आला नाही. त्यांनी फक्त त्यांचं बघावं असे म्हणत आमदार रवी राणा यांच्या दाव्यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे. तसेच तुम्ही कोणाचे गुलाम नाही हे निवडणूक आयोगाला सांगावं लागत आहे अशी खोचक टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. एक्झिट पोलचे निकाल समोर आले आणि इंडिया आघाडी, एनडीएसह राज्यातही महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेतेही दावे-प्रतिदावे करताना दिसत आहेत. अशातच आता निवडणूक निकालाला काही तास बाकी असतानाच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपासह निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे.आज प्रसार माध्यमांशी बोलतांना संजय राऊत म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी निवडणुकीच्या वेळी ध्यानात बसतात आणि मीडिया पूर्ण फोकस त्यांच्यावर करते हे कोड ऑफ कंडक्टचे उल्लंघन आहे. जयराम रमेश यांनी सांगितल्याप्रमाणे केंद्रीय गृहमंत्री देशातील वेगवेगळ्या क्षेत्रातील जवळपास १५० कलेक्टर आणि डीएमला फोन करून सूचना देतात, हे कोड ऑफ कंडक्टचा उल्लंघन आहे. पोलिंग एजंटला ज्याप्रकारे धणकावलं गेलं, हे बरोबर नाही आहे. हे याआधी कधी झालं नाही. एक्झिट पोल ज्याप्रकारे समोर आले आहेत, त्या माध्यमातून लोकांवर मानसिक दबाव टाकण्याचा प्रयत्न होत आहे, हे देखील कोड ऑफ कंडक्टचं उल्लंघन आहे'', असा आरोप संजय राऊतांनी कला आहे.

# भोकनळ सरांच्या भेटीने चिंचोटीकर गेले भारवून विद्यार्थी घडवणारे असे आदर्श शिक्षक चिंचोटीकरांना पुन्हा लाभलेच नाहीत

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील,जिल्हा परिषद शाळेवर मागील १५ वर्षांपूर्वी कार्यरत असणारे भोकनळ सर सपकाळ कुटुंबीयांच्या भेटीला अचानकपणे आल्याने चिंचोटी कर गेले भारावून.

सविस्तर वृत्त असे की,मागील १५ वर्षांपूर्वी भोकनळ सर आणि त्यांच्या पत्नी श्रीमती जाधव मॅडम चिंचोटी येथे जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होते त्यांच्या कार्यकाळामध्ये चिंचोटी येथे अनेक विद्यार्थी त्यांनी घडले त्यामुळे अनेक विद्यार्थी शासकीय नोकरीला लागले तर अनेक जन यशस्वीपणे आपला व्यवसाय करत आहेत .भोकनळ सर म्हणजे अत्यंत शिस्तप्रिय शिक्षक होते विद्यार्थी प्रिय होते म्हणून चिंचोटीकर आजही त्यांचं आदराने नाव घेतात नुसते विद्यार्थीच नव्हे तर पालकही भोकनळ सर चिंचोटी गावामध्ये आल्यानंतर त्यांना भेटण्यासाठी मोठ्या संख्येने जमले होते यावेळी अनेक जुन्या गोष्टींना उजाळा देण्यात आला जेव्हा जेव्हा शाळेमध्ये विविध कार्यक्रम होत असतात किंवा शैक्षणिक गुणवत्तेचा विषय निघत असतो तेव्हा गावकरी भोकनळ सर सारखे आता आदर्श शिक्षकच पाहिजेत अशी पालक वर्गात चर्चा असते. चिंचोटी सारख्या ग्रामीण भागात भोकनळ सरांनी शैक्षणिक चळवळ गतिमान करण्याचं काम केलं आणि या चळवळीतूनच अनेक विद्यार्थी घडले त्यांच्या या कार्याबद्दल गावकरी सदैव ऋणी राहतील त्यांचा हस्ताक्षर सुधारण्यावर भर होता चींचोटीच्या विद्यार्थ्यांसारखे वडवणी तालुक्यामध्ये कोणत्याही विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर नसायचे गणित, मराठी, हिंदी ,इंग्रजी यासारख्या विषयात विद्यार्थी अत्यंत तरबेज झाले होते चिंचोटी चा विद्यार्थी म्हटलं की हुशार असणारच असा लौकिक त्यांनी गावाला मिळवून दिला होता. असे विद्यार्थी प्रिय आदर्श



शिक्षक बऱ्याच वर्षानंतर गावांमध्ये आल्यानंतर चिंचोटी करांना खूप आनंद झाला होता यावेळी गावातील सुमंत गोंडे, शिवाजी गोंडे,ग्रामपंचायत सदस्य केशव गोंडे ,उपसरपंच गोविंद गोंडे ,मारुती गोंडे,अर्जुन गोंडे,महेश उबाळे,साहेबराव गोंडे,समाधान गोबरे,राजू दादा गोंडे,बप्पा कांबीकर,नामदेव जावळे आणि इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.सपकाळ कुटुंबामध्ये दुःखद घटना घडल्याचे कळताच संगमनेर येथून आपल्या कुटुंबासह येऊन सपकाळ कुटुंबीयांचं सांत्वन केले.भोकनळ सरांनी दुपारच्या सुट्टीमध्ये सुरू केलेला क्रिकेटच्या खेळयाची चिंचोटीकारांना आजी खूप आठवण येते.परंतु त्यांची बदली झाल्यापासून धावपळीच्या जीवन शैलीमध्ये मैदानी खेळ खेळायला कोणालाही वेळ राहिला नाही मात्र भोकनळ सरांची सुरू केलेल्या क्रिकेटची मात्र आजही आठवण मनात कायमचं घर करून आहे.गावातील अनेक समवयस्क तरुणा सोबत त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते गावातील अनेक च्या सुखदुःखात सदैव सामील होत असत त्यामुळे गावकरी आणि भोकनळ सर असं अतुट जिव्हाळ्याचं नातं निर्माण झाल आहेभोकनळ सर गावात आले आणि गेले अनेक विद्यार्थ्यांची त्यांची भेट झाली नाही याची खंत अनेकांच्या मनात राहिली.

सह्याद्रीचा राखणदार



# दुध सेवन हि अस्सल भारतीय संस्कृती-कुलगुरू डॉ.पाटील

## माफसूच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित आयोजित दुध प्या दिर्घायुषी व्हा या दुध जागृती अभियानाचा शुभारंभ प्रसंगी प्रतिपादन

**नागपुर । प्रतिनिधी**

दुध सेवन हि अस्सल भारतीय संस्कृती असून दुधाचे मानवी आरोग्याचे दृष्टीने अनन्य साधारण महत्व आहे त्यामुळे आरोग्यदायी जिवन जगण्यासाठी प्रत्येकाने दुधाचे सेवन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठाचे कुलगुरू डॉ नितीन पाटील यानी केले. ते विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त जागतीक दुध दिवसाचे औचित्य साधून आयोजित दुध जागरुकता अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते. सदरील कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून संशोधन संचालक डॉ नितीन कुरकुरे, अभियानाचे संयोजक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ अनिल भिकाने व मुख्य वक्ते तथा अधिष्ठाता दुग्ध तंत्रज्ञान डॉ प्रशांत वासनिक उपस्थित होते.




प्रास्तविक पर भाषणात या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे संयोजक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ अनिल भिकाने यानी दुध प्या दिर्घायुषी व्हा! या टॅग लाईन खाली राज्यभर दुध जागरुकता अभियान हे पुढील वर्षभर राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. या अभियानाचा मुख्य उद्देश अलिकडील काळात दुधा बद्दल लोकामध्ये निर्माण झालेले गैरसमज दुर करून तसेच फास्ट फुडकडे वळलेल्या तरुणाईस दुधाचे महत्व सांगून राज्यात दुधाचे सेवन वाढण्यासाठी जागरुकता निर्माण करणे असल्याचे सांगीतले. राज्यात दर डोई दुधाचे सेवन हे ३२९ ग्रॅम असून देशाच्या सरासरी ४५९ ग्रम पेक्षा खूप कमी असल्याचे सांगीतले . दुधाचे सेवन वाढले तर दुध दर वाढीस चालना मिळून दुध उत्पादन वाढीस चालना मिळून शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल.

या प्रसंगी ऑनलाईन पध्तीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहूणे डॉ नितिन कुरकुरे यानी जागतीक दुध दिवसाचा इतिहास सांगून महत्व विषद केले.

मुख्य वक्ते दुग्ध तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ प्रशांत वासनिक यानी त्याच्यां भाषणात दुधाचे घटक ,दुधाच्या प्रत्येक घटकाचे मानवी आरोग्यासाठी महत्व व फायदे सांगीतले. गाईच्या व वेगन दुधातील फरक विषद करताना दुधात १३ नैसर्गिक पोषकतत्वे असुन वेगन दुधात ५-१० वनस्पतीजन्य पोषकतत्वे असुन ते उत्पादक कंपनी नुसार त्याचे प्रमाण बदलत असतात. गाईच्या दुधातील स्निग्ध पदार्थ, प्रथिने, विटामीन्स व खनिजे पचनास हलके असुन त्यांचे पोषणमुल्य अधिक असल्याचे सप्रमान सांगितले. ए वन व ए टु दुध हे विपणन धोरण असल्याचे व भारतात उपलब्ध जनावरांचे दुध हे ए टु प्रकाराचे असल्याचे एन.बीए जी आर,करनाल येथील राष्ट्रीय संस्थेनी संशोधनाअंती जाहीर केल्याचे नमुद करुन आपल्याला ए वन दुधाची भिती बाळगण्याची गरज नसल्याचे सांगितले.

दुधामुळे जीवनशैलीचे आजार होतात हे मिथक असुन डॉ.मोहन, मधुमेह रोग तज्ञ ,चेन्नई यांच्या संभाव्य शहरी ग्रामीण महामारी विज्ञान अभ्यासगट यांनी पाच महाद्विपातील ,२७ देशातील जवळपास २ लक्ष लोकांवर सतत २० वर्ष केलेल्या संशोधनाचे निष्कर्षानुसार दुधाच्या नियमित सेवनाने मधुमेह, ह्रुदयरोग व इतर जीवनशैली चे आजारापासुन संरक्षण व पोषण सुधारण्यासोबतच मृत्युदर कमी होतो असे नमुद केले.

सदरील व्याख्यानास माफसू अंतर्गत सर्व महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता प्राध्यापक, विद्यार्थी, शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजन समितीचे सचिव डॉ गजानन नारनवरे व डॉ प्रविण बनकर तर आभार प्रदर्शन डॉ सारीपुत लांडगे यानी केले

विद्यापिठाअंतर्गत सर्व दहा पशुवैद्यक , दुग्ध तंत्रज्ञान व मत्स्य विज्ञान महाविद्यालये, तिन कृषि विज्ञान केंद्र तसेच संलग्नीत ७२ दुध व्यवस्थापन पदविका शाळातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ, शिक्षक व विद्यार्थ्यांनी राज्यभर सामुहीक दुध सेवन, सेल्फी वुईथ ग्लास ऑफ मिल्क, प्रबोधनपर व्याख्याने, रॅली, प्रकाशने आदी १०० उपक्रम राबवले.

# पुलगाव रेल्वे स्थानकावर पाण्याचा ठणठणाट

**पुलगाव । प्रतिनिधी**

उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रत्येकाला पाण्याची गरज आहे. पिण्याकरिता पाणी न मिळाल्यास जीव व्याकुळ होत आहे. सहज उपलब्ध होणारे पाणी न मिळाल्यास विकतचे पाणी घेऊन तहान भागविण्याचा प्रयत्न रेल्वे प्रवासी करतात. पण कधी कधी तेही विकत मिळत नाही. रेल्वे स्थानकावर असलेली पाण्याची व्यवस्था निष्क्रिय ठरल्यामुळे प्रवाशांचे न पहावल्या जाणारे हाल होत आहे.

मध्य रेल्वे मार्गावरील पुलगाव रेल्वे स्थानक अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. येथील दोन्ही फलाटांवर प्रवाशांच्या सुविधेकरिता पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ठराविक अंतरावर बसविण्यात आलेल्या नळांना पाणी येत नसल्यामुळे गाडीच्या प्रतीक्षेत थांबणाऱ्या प्रवाशांना पिण्याकरिता पाणी मिळत नाही.



रेल्वेतून प्रवास करणारे अनेक प्रवासी पाणी घेण्याकरिता येथील रेल्वे स्थानकावर उतरतात.पण नळाला पाणी नसल्याने त्यांची निराशा होते अशावेळी प्रवाशांना इतर नळावर पाणी मिळेल,म्हणून धावपळ करावी लागते. ज्या डब्यातून प्रवासी प्रवास करतो त्या डब्यापासून दूरवर पाणी घेण्याकरिता गेल्यानंतर प्रवाशाला डब्यापर्यंत परत येण्यास विलंब होतो.परिणामी त्याचे डब्यात असलेले इतर सहकारी किंवा परिवारातील अस्वस्थ होतात. विशेष म्हणजे फलाट क्रमांक एकवर असलेली कॅन्टीन देखील बंद रहात असल्याने प्रवाशांना विकतचेही पाणी मिळत नाही .

रेल्वेतून प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांना पाणी उपलब्ध करून देणे,ही जबाबदारी रेल्वे प्रशासनाची आहे. पण येथील अधिकाऱ्यांना त्याचा विसर पडल्याचे दिसते. रेल्वे फलाटावर पाणी का नाही. याची चौकशी करून तातडीने पाण्याचा ठणठणात दूर करावा,अशी रेल्वे प्रवाशांची मागणी आहे. गावातील दानशूर व्यक्तींनी दोन वॉटर कुलर पुलगाव रेल्वे स्टेशनला दिले होते. ते कुठे आहेत.याचाही शोध घेणे आवश्यक आहे.

# माजी जि.प.उपाध्यक्ष शिवसेना जिल्हा उपप्रमुखांना जीवे मारण्याची धमकी

## गोंडपिपरी पोलिसात तक्रार दाखल

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

डचिरोली जिल्ह्यातील सूरजागड लोह खनिज प्रकल्पातून कच्चा मालाची दिवस रात्र वाहतूक सुरू आहे. त्यामुळे गोंडपिपरी मार्गावर अनेक अपघात घडत असल्याने अनेकांना जीव गमवावा लागला. त्यामुळे विविध मागण्या घेवून गोंडपिपरीं तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे तालुका अध्यक्ष, कार्यकर्ते,विविध सामाजिक संघटनेचे यासह व्यापारी संघटनेच्या पदाधिकारी यांच्या पुढाकाराने सुरजागड वाहतूक विरोधात दि .१४ जून रोज शुक्रवार रास्ता रोको आंदोलन करण्याबाबत शिवसेना उबाठा चे जिल्हा उपप्रमुख संदीप करपे ,शिवसेना तालुका प्रमुख सूरज माडुरवार,भाजप तालुका अध्यक्ष बबन निकोडे,काँग्रेस तालुका अध्यक्ष तुकाराम झाडे,काँग्रेस शहर अध्यक्ष राजू झाडे,नगरसेवक सुनील संकुलवार पंकज डांगी,अशपाक कुरेर्शी, शैलेश बैस,तुकाराम सातपुते, नितीन



धानोरकर,भाजपचे शहर अध्यक्ष तथा न.प नगरसेवक चेतनसिंह गौर , राकेश पून ,साईनाथ मास्टे, निलेश पुलगमकर, भाजपा महीला तालुका अध्यक्ष सुरेखा श्रीकोंडावार,संजय झाडे यांनी गोंडपिपरीचे उपविभागीय दंडाधिकारी स्नेहल रहाटे यांना निवेदन देण्यात आले होते .त्याच पार्श्वभूमीवर बैठकाही सातत्याने होत असून एका मोठ्या जण आंदोलनाची तयारी सर्वपक्षीय नेते कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांकडून नियोजन सुरू आहे अशातच आज दिनांक ३ सोमवारी दुपारी १२ वाजाताचे दरम्यान संदिप करपे हे आपल्या दुकानासमोर उभे असताना एका टू व्हीलर वरून आलेल्या इसमाने गाडीवरून - अगर सुरजा गड कंपनी विरोधी आंदोलन किया तो एक्सीडेंट करके उडा देंगे! अशी धमकी देऊन पसार झाले.यामुळे आंदोलन एक नवीन वळणावर पोहचले आहे.घटनेची तक्रार पोलिस स्टेशन गोंडपिपरी येथे दिलेली असून भारतीय दंड संहिता १८६० धारा ५०६ अंतर्गत अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार रमेश हत्तीगोटे करीत आहेत

# आर्थिक विवंचनेतून रेल्वे समोर उडी घेऊन इसमाने केली आत्महत्या

**मूल । प्रतिनिधी**

आर्थिक विवंचनेतून टोकाचे पाऊल उचलत एका विवाहित इसमाने गोंदिया-चंद्रपूर या धावत्या रेल्वेसमोर उडी घेवून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना सोमवारी(दि.३) दुपारी १२ वाजता दरम्यान मूल तालुक्यातील बेलघाटा गावाजवळील रेल्वे गेटच्या जवळ घडली.




बंडू राजन्ना नलूरवार वय ५० वर्षे वॉर्ड न.२ मूल असे मृत इसमाचे इसमाचे नाव आहे.

मूल शहरातील कुणबी मोहल्ला वार्ड नंबर २ येथे राहणाऱ्या बंडू नलुरवार यांचे कपडे प्रेस करायचे छोटेशे दुकान होते.मात्र मिळणाऱ्या उत्पन्नातून कुटुंबाचा गाडा हाकणे शक्य नसल्याने मागील दोन महिन्यांपासून आर्थिक विवंचनेत होता.अशी माहिती पोलिसांच्या प्राथमिक चौकशीतून पुढे आली.आर्थिक अडचणीमुळे नैराश्यात असलेले बंडू नलुरवार हे सकाळी घरून निघून मूल शहरापासून जवळपास ५ किमी अंतरावर असलेल्या सिंदेवाही मार्गावरील बेलघाटा गावाजवळील रेल्वे गेट च्या जवळपास उभे होते.दरम्यान गोंदियाकडून चंद्रपूर कडे येणारी रेल्वे येताच रेल्वे समोर उडी घेतली.यात बंडूच्या शरीराचे छिन्नविछिन्न तुकडे झाले.घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस दाखल होवून मृतदेह शविच्छेदनासाठी मूल येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला.बंडूच्या दुर्दैवी मृत्यूने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.आत्महत्येचे नेमके कारण कळू शकले नाही.पुढील तपास मूल पोलीस करीत आहेत.

# चारधाम यात्रेसाठी ऑनलाईन नोंदणी आवश्यक भाविकांना उत्तराखंड शासनाचे आवाहन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

चारधाम यात्रेसाठी संपूर्ण भारतातून भाविक मोठ्या प्रमाणात उत्तराखंड येथे पोहचत असल्यामुळे प्रशासनाच्या व्यवस्थेवर ताण पडत आहे. भाविकांना सुलभ व सहजपणे यात्रा पूर्ण करता यावी यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे ऑनलाईन नोंदणी केल्याशिवाय चारधाम यात्रेचे नियोजन करु नये, असे आवाहन उत्तराखंड राज्याच्या मुख्य सचिव राधा रतुडी यांनी केले आहे.



चारधाम यात्रेतील दर्शनाचे प्रक्रिया सुलभ व्हावी तसेच भाविकांना ऑनलाईन नोंदणीनुसार सहज दर्शन उपलब्ध करण्याच्या दृष्टीने उत्तराखंड प्रशासनाने https://registration andtouristcare.uk.gov.in संकेतस्थळ सुरु केली आहे. ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केलेल्या भाविकांना दर्शन घेता येणार आहे. जेष्ठ नागरीक, तसेच वैद्यकीय उपचार घेत असलेल्या नागरिकांना यात्रा सुरु करण्यापूर्वीचे वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत असणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासंबंधित उत्तराखंडच्या सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्या https://health.uk.gov.in/pages/display/140-char-dham-yatra-health-advisory या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. चारधाम यात्रेसाठी नियोजन केलेल्या जिल्ह्यातील सर्व भाविकांनी ऑनलाईन नोंदणी करुनच प्रवास करावा तसेच यात्रेदरम्यान होणारी गैरसोय व गर्दी टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकारी संजय दैने यांनी केले आहे

# आयुष्यमान भारत योजना विकास प्रक्रीयेचा भाग-ना.विखे पाटील




**अहमदनगर । प्रतिनिधी**

आरोग्य क्षेत्रात मोठी गुंतवणूक करून पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशामध्ये सुरू आहे.आयुष्यमान भारत योजनेची अंमलबजावणी विकास प्रक्रियेचा भाग असल्याचे प्रतिपादन महसूल तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.शहरातील दिनदयाळ प्रतिष्ठान परीवार,दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था आणि सुरभी रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सर्वरोग निदान शिबीराचे उद्घाटन मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी पंतसंस्थेचे चेअरमन वसंत लोढा सुरभी रुग्णालयाचे चेअरमन अनिरूध्द देवचक्के माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.पतसंस्थेने सभासदांकरीता सुरू केलेल्या हेल्थ कार्ड योजनेचा शुभारंभ यानिमिताने करण्यात आला.या उपक्रमाबद्दल मंत्री विखे पाटील यांनी संस्थेच्या सर्व पदाधिकार्यांचे अभिनंदन करून आज आरोग्य सुविधेचा वाढत्या खर्चाचे सर्वात मोठे आव्हान समाजासमोर आहे.यासाठी आयुष्यमान भारत योजना सुरू करून यामाध्यमातून पाच लाख रुपयांपर्यत मोफत उपचार देण्याची अंमलबजावणी होत आहे.राज्य सरकारने महात्मा फुले जनआरोग्य योजना सुरू त्यामध्येही सर्व अटी काढून पाच लाख रुपयांपर्यत उपचार मोफत देण्यात येतील.यामध्ये काही ग्रामीण भागातील रूग्णालय चालकांनी बेडची अटीमध्ये बदल करण्याच्या केलेल्या मागणीबाबत राज्य सरकार निश्चित विचार करेल असे विखे पाटील म्हणाले.देशात आज आरोग्य सुविधला विकासाचा भाग बनविण्यात आले असून आरोग्य सुविधेला बळकटी देण्यासाठी मोठी गुंतवणूक होत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .